उप संचालक, आरोग्य सेवा,मुंबई मंडळ,ठाणे
यांच्या अधिपत्याखालील ग्रामीण रुग्णालय ,
शेटफळ, जिल्हा-सोलापूर येथील १५अस्थायी पदांना
मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१८/प्रक्र-१८३/आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १६ मे,२०१८.

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. अपदे २०१७ /प्रक्र-१२९/आरोग्य ३(अ) दिनांक- ०९.०२.२०१८.
२) सहसंचालक (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५अ/ग्रारुशेटफळजिसोलापूर/अपदे-१५/सन १८-१९/४०७५-७/१८ दिनांक-१४.०५.२०१८.
३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः पदनि २०१६/प्रक्र-८/१६/आ.पु.क. दि.०५.०३.२०१८.

शासन निर्णय:-

संदर्भाधीन क्र.१ येथील शासननिर्णयान्वये उप संचालक, आरोग्य सेवा,मुंबई मंडळ,ठाणे यांच्या अधिपत्याखालील ग्रामीण रुग्णालय, शेटफळ, जिल्हा-सोलापूर येथील १५ अस्थायी पदांना दि.१.१.२०१८ दि.२८.२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन सदर पदांना दि.१.०३.२०१८ ते दि.३०.९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर १५ अस्थायी पदाना शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्रक्र-८/१६/आ.पु.क दिनांक ०५.०३.२०१८ मधील अटीच्या अधीन राहून दिनांक १.३.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर पदांवरील खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-१९ या वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक-आर-१</u>
२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६-सार्वजनिक आरोग्य
००१ - संचालन व प्रशासन
००१(०८)- प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रा.रु.इतका दर्जा वाढविणे
(२२१० ०४१३)

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६ / प्र.क्र. ८/ १६/आ.पु.क.दि.५.३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०५१६१६५१५५६७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.05.16 18:11:35 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय-राज्यस्तर), मुंबई
५. सहसंचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन) मुंबई
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
७. जिल्हा शल्य चिकीत्सक,सोलापूर
८. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय,शेटफळ, जिल्हा-सोलापूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर / पुणे
१०. वित्त विभाग व्यय-१३/ वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य-३अ)

विवरणपत्र - अ

पुणे मंडळातील ग्रामीण रुग्णालय, शेटफळ जि. सोलापूर येथील अस्थायी पदे सन २०१८ - २०१९ या वर्षाकरिता पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव.

अ.क्र.	तात्पुरत्या जागा प्रथमत: ज्या शासन निर्णयवये निर्माण झाल्या तो शासन निर्णय क्र. व दिनांक.	पदनाम	पदांची संख्या.	वेतन श्रेणी.	ज्या शासन निर्णयान्वये पद शेवटी पुढे चालू ठेवण्यात आले आहे तो शासन निर्णय क्रमांक व दिनांक	ज्या तारखेपासून पद पुढे चालू ठेवायचे आहे तो दिनांक	लेखाशिर्ष	पदे पुढे चालू ठेवण्याचे स्पष्टीकरण
	शासन निर्णय क्र. पदनि २०१३/प्र.क्र. १४१/आरोग्य ३ दिनांक १३.५.२०१४	वैद्यकिय अधिक्षक	१	१५६००-३९१००	सा.आ.विभाग शासन निर्णय क्र. अपदे-२०१७/प्र.क्र.१२९/आ-३ अ दिनांक ९.२.२०१८		२२१० वैद्यकिय व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ००१-संचालन व प्रशासन (०१) (०८) प्रा.आ.केंद्राचा ग्रा.रु. इतका दर्जा वाढविणे. (२२१००४१३)	ग्रामीण भागीतील रुग्णांना आरोग्य विषय सुविधा पुरविणेसाठी सदर पदांना मुदतवाढ देणे आवश्यक
		वैद्यकिय अधिकारी	३	१५६००-३९१००				
		अधिपरिचारीका	७	९३००-३४८००				
		क्ष-किरण तंत्रज्ञ	१	९३००-३४८००				
		प्रयोगशाळा तंत्रज्ञ	१	९३००-३४८००				
		औषध निर्माण अधिकारी	१	५२००-२०२००				
		प्रशोगशाळा सहाय्यक	१	५२००-२०२००				
	एकुण		१५					